|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. कबचौउमवि/१४/विवि/वि.सा.सं/ 189 /२०१९ ई-पत्रक दि. २२/०७/२०१९

प्रति,
१) मा.प्राचार्य/ संचालक, विद्यापीठशी संलग्न सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त परिसंस्था
२) मा.संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग

**विषय :- विद्यार्थी साहित्य संमेलनात सहभागी होणेबाबत..**

महोदय/ महोदया,

आपणास विदितच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा नामविस्तार मागील वर्षी संपन्न झाला. संपूर्ण महाराष्ट्राच्या ओठांवर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या गाण्यांनी गारुड केले आहे. खानदेशाच्या बोली भाषेतील ग्रामीण जीवनाचे यथार्थ चित्रण बहिणाईने आपल्या गाण्यातून केले. लोकव्यवहार, लोकपरंपरा आणि लोकनार्तीचे अपूर्व दर्शन म्हणजे **बहिणाईची गाणी** होय. खानदेशाच्या मातीला लाभलेला साहित्यांचा हा वारसा चिरंतन टिकावा यासाठी विद्यापीठाने **विद्यार्थी साहित्य संमेलन** सुरु करण्याचे ठरविले आहे. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि वाढीसाठी विद्यापीठाने उचललेले पाऊल उद्यासाठी महत्वाचे ठरेल. विद्यार्थ्यासाठी साहित्या विषयीची अभिरुची, आवड आणि सर्जनशीलता वाढावी यासाठी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग सदैव अग्रेसर आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव आणि मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले **विद्यार्थी साहित्य संमेलन मू.जे. महाविद्यालय प्रांगणात मंगळवार, दिनांक १३ ऑगस्ट, व बुधवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०१९** या दोन दिवसात संपन्न होणार आहे. आपले महाविद्यालय/ परिसंस्था/ प्रशाळा/ विभागातील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील नियमित प्रवेशित विद्यार्थी या साहित्य संमेलनात सहभाग घेऊ शकतो. **भाषा विभागा सोबत इतर विभागातील विद्यार्थी सुध्दा या साहित्य संमेलनात भाग घेऊ शकतील.** साहित्य क्षेत्रात नुकतेच पाऊल टाकणा-या आणि स्वत:चीच निर्मिती असणा-या प्रत्येक महाविद्यालयातून **किमान चार (४)** विद्यार्थ्यांना या संमेलनास पाठविणे अनिवार्य आहे.

या दोन दिवसीय साहित्य संमेलनात ग्रंथ दिंडी, ग्रंथ प्रदर्शन, उद्घाटन सत्र, परिसंवाद (३), कथाकथन (१), कवि संमेलन (२), मुलाखत (१) यांचा समावेश असेल. पहिल्या दिवशी सकाळी ८ वाजेपासून दुपारी २ वाजेपर्यत निवड फेरी घेतली जाणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक दर्जेदार साहित्याची निवड करतील. दुस-या दिवशी विद्यार्थ्याला आपली कला सादर करता येणार आहे. विद्यार्थी साहित्यिकाची निवड गुप्त ठेवण्यात येईल. दुस-या दिवशी त्या-त्या साहित्य कला मंचावर सादरीकरणाअगोदर निवड झालेल्या विद्यार्थ्याचे नावे जाहीर केले जाईल. सहभागी विद्यार्थ्यांची भोजनाची व निवासाची व्यवस्था नि:शुल्क करण्यात आलेली आहे. सहभागींना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल.

तरी आपले महाविद्यालय/ परिसंस्था/ प्रशाळा- विभागातील किमान चार (४) विद्यार्थ्यांची नावे खाली दिलेल्या अर्जासोबत आणि त्यांच्या स्व:निर्मित लिखाणाच्या प्रतीसह (Script) सोमवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०१९ रोजी विद्यार्थी विकास विभागाकडे पाठविणे आवश्यक आहे.

कळावे- धन्यवाद !

आपला विश्वासू,

(डॉ. सत्यजित साळवे)
संचालक, विद्यार्थी विकास

**प्रत -**
१) उपकुलसचिव, मा.कुलगुरु कार्यालय
२) सहायक कुलसचिव, मा.प्र-कुलगुरु कार्यालय
३) कक्ष अधिकारी, मा.कुलसचिव कार्यालय

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

## पहिले विद्यार्थी साहित्य संमेलन

Photo

प्रवेश अर्ज

१. विद्यार्थ्याचे नाव : कुमार/ कुमारी ------------------------------------------------

२. वर्ग : ------------------------ ३. जन्म तारीख ------------------------------

४. मोबाईल क्र. ------------------------ ५. ई-मेल ------------------------------

६. महाविद्यालयाचे नाव : ----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------

७. आपल्याला खालील कोणत्या कला प्रकारात सहभागी व्हायचे आहे ? (कोणत्याही एकाच साहित्य कला प्रकारासमोर ✓ अशी खून करावी.)

कवि संमेलन/ कविकट्टा ☐ कथाकथन ☐

मुलाखत* ☐ सूत्रसंचालन* ☐

**परिसंवाद : आपला जिल्हा आपला संवाद**

☐ जळगाव : विषय : सोशल मिडीया आणि तरुणाई (वेळ ८ मिनिटे)

☐ धुळे : विषय : साहित्य आणि समाज (वेळ ८ मिनिटे)

☐ नंदूरबार : विषय : आम्ही काय वाचतो ? (वेळ ८ मिनिटे)

☐ खानदेशाची लोकधारा* : **माहेरी आल्या बहिणाई** (फक्त मुलींसाठी)

(खानदेशातील विविध बोलीतील संकलितः गाणी/ उखाणी/ चिटकुले/ विनोद/ नाटयछटा/ एकपात्री सादर करता येईल)

८. आपण आजपावेतो मराठी साहित्याची कोणती पुस्तके वाचली आहेत ? (लेखक- पुस्तकाचे नाव किमान पाच)

१. ---------------------------- २. -------------------------- ३. ------------------------------

४. ---------------------------- ५. --------------------------

९. आपण इतर ठिकाणी सहित्य उपक्रमात सहभागी झाला आहात काय ? (महत्त्वाचे किमान पाच)

१. ---------------------------- २. -------------------------- ३. ------------------------------

४. ---------------------------- ५. --------------------------

(* प्रतिज्ञापत्र लागू नाही)

--- प्रतिज्ञापत्र ----

१०. मी ------------------------------------------ वर्ग ----------------- प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, सदर साहित्य संमेलनात मी ज्या कला प्रकारात सहभाग घेतला आहे, त्या साहित्याची निर्मिती माझी स्वत:ची असून, इतर कुणाचेही चौर्य-वाड्.मय नाही याची मला खात्री आहे. ही संपूर्णता माझीच सर्जनता आहे, यासंबंधी काही खोटा प्रकार उघडकीस आल्यास मी स्वत: त्याला सर्वस्वी जबाबदार राहील.

आपला विद्यार्थी

महाविद्यालयाच्याभाषा विभागाने लिखाणाची
(Script) सत्यता प्रमाणित करुन द्यावी.
सही व शिक्का

(विद्यार्थ्याची स्वाक्षरी)

प्राचार्य
सही व शिक्का